# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.11.2025** **वारःसोमवार**

---

- राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आज अंगोलाच्या संसद सदस्यांना संबोधित करणार.
- पंतप्रधान उद्यापासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर, जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन करणार.
- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी अंतिम टप्प्यातील मतदान उद्या.
- ISSF जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अनिश भानवालला रौप्यपदक.
- आणि
- देशाच्या काही भागात थंडीचा कडाका वाढण्याचा अंदाज.

**<u>राष्ट्रपतीअंगोला</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज अंगोलाची राजधानी लुनाडामध्ये अंगोलाच्या संसद सदस्यांना संबोधित करणार आहेत. राष्ट्रपतींनी काल अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ लोरन्को यांच्याशी विस्तृतपणे चर्चा केली. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारत, अंगोलासमवेत संसदीय सहकार्य वृद्धिंगत करण्याची आशा बाळगत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. ऐकूया याविषयीचा एक वृत्तांत –

व्हीसी-मनीष-50 सेकंद दोन्ही देशांच्या राष्ट्रपतींनीं द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा केली. त्यांनी ऊर्जा, पायाभूत सुविधा, संरक्षण, आरोग्य, शेती आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भागीदारी वाढवण्यावर भर दिला. यादरम्यान मत्स्यपालन, जलकृषी, सागरी संसाधने आणि कॉन्सुलर विषयांवर सहकार्य वाढवण्यासाठी समझौता करार करण्यात आले.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अँगोलाच्या आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्स आणि ग्लोबल बायोफ्युअल अलायन्स मध्ये सामील होण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. अँगोलाचे राष्ट्रपती यांनी भारताच्या आरोग्य, अवकाश आणि संरक्षण तंत्रज्ञानातील कौशल्याचे कौतुक केले. ते म्हणाले की या क्षेत्रांमध्ये भारताबरोबरचे सहकार्य अँगोलासाठी विशेषतः फायदेशीर ठरेल.

भारताच्या राष्ट्रपतींचा हा पहिलाच अफ्रिका दौरा आहे. राष्ट्रपती उद्या अंगोलाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. अंगोलातील प्रवासी भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधतील. आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात त्या बोत्सवाना देशाला भेट देणार आहेत.

पंतप्रधान

पंतप्रधान उद्यापासून दोन दिवस भूतानच्या दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी भुतानचे राजे जीग्मे खेसर नामग्येल वांगचूक यांची ते भेट घेतील. यावेळी  एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांगचु- या जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल. हा प्रकल्प भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे विकसित केला आहे. पंतप्रधान भूतानचे चौथे राजा जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात सहभागी होतील आणि भुतानचे पंतप्रधान त्शेरिंग तोबगे यांचीही भेट घेतील.
पंतप्रधानांच्या या भेटीमध्ये दोन्ही देशांदरम्यानची द्विपक्षीय भागीदारी बळकट होण्याच्या दृष्टीने विविध मुद्यांवर चर्चा अपेक्षित आहे. असं परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

उत्तराखंडमधील रौप्य महोत्सवी प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल  देहरादून इथं काल झालं. या कार्यक्रमात ८ हजार २६० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. यामध्ये पिण्याचे पाणी, सिंचन, तांत्रिक शिक्षण, ऊर्जा, शहरी विकास, क्रीडा आणि कौशल्य विकास यासारख्या प्रमुख क्षेत्रांशी संबंधित विकास प्रकल्पांचा समावेश आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत, पंतप्रधानांनी २८ हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांना ६२ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची आर्थिक मदत थेट बँक खात्यात हस्तांतरित केली. देहरादून इथं वन संशोधन संस्थेच्या आवारामध्ये एका मेळाव्याला त्यांनी संबोधित केलं.  उत्तराखंडच्या नवीन चित्रपट धोरणामुळे चित्रीकरण, लग्नसमारंभासाठीचे पसंतीचे स्थळ म्हणूनही राज्य वेगाने उदयास येत आहे. 'व्होकल फॉर लोकल' मोहिमेअंतर्गत उत्तराखंडमधील स्थानिक उत्पादने जागतिक स्तरावर पसंतीस उतरत असून 'एक जिल्हा - एक महोत्सव' उपक्रमाद्वारे उत्तराखंडला जागतिक पर्यटन नकाशावर आणता कसे आणता येईल यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचं मोदी यावेळी बोलताना सांगितलं.

**पंतप्रधानमोदी**

गोव्यात काल पार पडलेल्या आयर्नमॅन 70.3 या उपक्रमांतील वाढत्या सहभागाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. या स्पर्धेतील सर्व सहभागींचं त्यांनी अभिनंदन केलं आहे. असे कार्यक्रम फिटइंडिया अभियानाला प्रोत्साहन देतात असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**बिहार**

बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी सर्व व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे. उद्या २० जिल्ह्यांमधील १२२ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. १३६ महिलांसह एक हजार ३०२ उमेदवारांचे भवितव्य ३ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार ठरवतील. मतदान सकाळी ७ वाजता सुरू होईल आणि संध्याकाळी ६ वाजता संपेल, ७ मतदारसंघांत सुरक्षेच्या कारणास्तव मतदान प्रक्रिया संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल. या टप्प्यासाठी प्रचार काल संध्याकाळी संपला. सर्व पक्षातील प्रमुख नेत्यानी आपापल्या मतदारसंघातील मतदारांचा विश्वास जिंकण्याच्या उद्देशाने प्रचारसभा आणि प्रत्यक्ष भेट घेऊन मतदारांशी संवाद साधला. पहिल्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया या महिन्याच्या ६ तारखेला पार पडली, या टप्प्यात सुमारे ६५ टक्के मतदान झाले. मतमोजणी या महिन्याच्या १४ तारखेला होईल.

**आसामबहुपत्नीत्व**

आसाम मंत्रीमंडळाने सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे पाऊल उचलत, आसाम बहुविवाह प्रतिबंध विधेयक २०२५ काल मंजूर केले. सहाव्या अनुसूचीत समाविष्ट क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात बहुपत्नीत्व प्रथा बेकायदा ठरवणे आणि नष्ट करणं हे या विधेयकाचं उद्दीष्ट आहे. जोडीदार हयात असताना, कायदेशीररित्या किंवा घटस्फोटाद्वारे वेगळे झाले नसतील तर हे विधेयक त्यांना पुन्हा लग्न करण्यास मनाई करेल. तसंच बहुपत्नीत्वामुळे प्रभावित महिलांना भरपाई देण्याची तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्रीस्टार्टअप**

देशभरात नोंदणी झालेल्या स्टार्टअप्समध्ये सर्वाधिक स्टार्टअप्स हे महाराष्ट्रातले असून, त्यापैकी ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली सुरू असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. मुंबईत एसएनडीटी महिला विद्यापीठात सुरू असलेल्या नवोन्मेष महाकुंभ 2025 चे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याचे लक्ष्य साध्य करण्यात महाराष्ट्राची विशेषतः महिला व्यावसायिकांची प्रमुख भूमिका असेल असा विश्वास महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**महाकुंभमेला**

महाराष्ट्रात नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर इथं होणाऱ्या कुंभमेळ्यादरम्यान भाविकांच्या सुलभ व्यवस्थापन आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी योजना तयार करण्याचे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले आहेत. राजेश कुमार दोन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर आले होते. त्यांनी त्र्यंबकेश्वर इथल्या विकास कामांची पाहाणी केली. कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी भाविकांच्या प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठीचे मार्ग वेगळे ठेवण्यावर भर दिला. संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक त्या सुविधा आधीपासूनच उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले आहेत.

**खट्टरशहरीदळणवळण**

दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमधील गतीशीलता नियोजनाला आतापासूनच सुरुवात झाली पाहिजे, जेणेकरून, भविष्यासाठी ती सुव्यवस्थित आणि सुसज्ज असतील असं प्रतिपादन केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मनोहर लाल खट्टर यांनी काल केले आहे. गुरूग्राम इथं शहरी गतीशील भारत परिषद आणि प्रदर्शनाच्या 18व्या आवृत्तीच्या समारोप सत्रात काल खट्टर बोलत होते. तीन दिवसांच्या परिषदेत या वर्षी ८ देशांतील सोळाशेहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला.यावेळी पीएम ई-बस सेवा योजनेच्या बोधचिन्हाचे आणि संकेतस्थळाचे उद्घाटनही खट्टर यांच्या हस्ते झालं.

**अमेरिकाशटडाऊन-मंजुष**

अमेरिकेत, शट डाऊन सुरु असल्याने विमान कंपन्यांनी १,७०० हून अधिक उड्डाणे रद्द केली आहेत. हवाई वाहतूक नियंत्रकांमध्ये कर्मचाऱ्यांच्या तीव्र कमतरतेमुळे हजारो उड्डाणे उशिराने होत आहेत.

**<u>तैवानचीन</u>**

नव्या प्रत्यार्पण करारांन्वये चीन जागतिक प्रभाव वृद्धींगत करत असताना, मानवी हक्क आणि लोकशाही यांच्या रक्षणासाठी जागतिक सहकार्य भक्कम करण्याचे आवाहन तैवानचे खासदार फॅन युन यांनी इंटर - पार्लिमेंटरी अलायन्स ऑन चायना म्हणजेच आयपॅक च्या शिखर परिषदेत केलं. ब्रुसेल्यमध्ये आयोजित या परिषदेत बोलताना युन यांनी चीनचा वाढता प्रभाव तैवानलाच धोका निर्माण करत नाही तर लोकशाही संस्थांनाही अस्थिर करत असल्याचा इशारा दिला आहे.

**<u>टायफून</u>**

फिलीपिन्सला फंग-वॉन्ग वादळानं धडक दिली असून, साधारण ९लाखांहून अधिक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे.वादळामुळे दोन लोकांना मृत्यू झाला आहे. स्थानिक भाषेत उवान नावाने ओळखल्या जाणारे वादळ जमिनीवर आदळण्यापुर्वी त्याचे मोठ्या वादळामध्ये रूपांतर झाले. यामध्ये १८५ किलोमीटर प्रति तास ते २३० किलोमीटर प्रतितास वेगाने जोराचे वारे वाहात होते. पूर्व फिलिपिन्समध्ये काल संध्याकाळी जोरजार पाऊस आणि वारे वाहात असल्याची माहिती स्थानिक हवामान अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<u>फिडे</u>**

गोव्यात सुरू असलेल्या फिडे बुद्धिबळ विश्वकरंडक स्पर्धेत, कार्तिक वेंकटरमण याने बोगदान-डॅनियल डीक याच्यावर मात करत चौथ्या फेरीत प्रवेश मिळवला आहे. तर विदित गुजराती, नारायण एसएल तसंच विश्वविजेता डी. गुकेश आणि अरविंद चिंथबरम् यांना पराभवाला सामोरं जावं लागलं.
अर्जुन एरिगाईसी, आर प्रज्ञानंद, पी हरिकृष्ण आणि जागतिक ज्युनियर विजेता व्ही प्रणव यांनी आधीच चौथ्या फेरीसाठी पात्रता मिळवली आहे.

**<u>नेमबाजी</u>**

इजिप्तमधील कैरो इथं सुरू असलेल्या, ISSF जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल नेमबाजी प्रकारात,भारताच्या अनिश भानवालाने रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेतील हा ऐतिहासिक विजय आहे. अंतिम फेरीत अनिशने २८ लक्ष्ये गाठली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे अनिश ऑलिंपिक स्पर्धेत पदक जिंकणारा पहिला भारतीय वैयक्तिक पिस्तूल नेमबाज ठरला आहे.

हवामान

भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील तीन दिवसांत मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानमधील पूर्व भाग आणि झारखंडमध्ये थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत ईशान्य भारतात किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याची अपेक्षा हवामान विभागाने वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**